# जिल्हा परिषद,गोंदिया
## ग्रामपंचायत विभाग

जि.प.प्रशासकीय इमारत,आमगांव रोड,गोंदिया 441601

ceozp.gondia@maharashtra.gov.in/www.zpgondia.gov.in Ph.No :- 07182 236425
dyceovpzp_gondia@rediffmaill.com/dyceovpgondia01@gmail.com

**e-file no :-** **ZPGON-12018(19)/1/2025-ZPGON-PAN** **दिनांक** :- / / 2025

## जाहीर बाजार लिलाव सुचना सन 2025-26

**विषय**:- सन 2025-26 या वित्तीय वर्षाकरीता जिल्हा परिषद मालकीचे आठवडी/बैठकी मवेशी बाजार व यात्रास्थळे ईत्यादीचा ( **दि. 01 एप्रील 2025 ते 31 मार्च 2026** ) कालावधीकरीता लिलाव सुचना. .

**संदर्भ**:- 1. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 124 अन्वये.
2. स्थायी समिती सभा जि.प.गोंदिया दिनांक 01/01/2025 ठराव क्रमांक. 3/3 अन्वये

जिल्हा परिषद, गोंदिया अंतर्गत आठवडी/ बैठकी बाजार, मवेशी बाजार व यात्रा बाजार इत्यादीचा जाहीर लिलाव सन 2025-26 करीता ( **दिनांक 01 एप्रील 2025 ते 31 मार्च 2026 पर्यंत) जिल्हा परिषद, गोंदियाचे जि. प. सभागृहात** खालील तारखेला घेण्यात येईल. सदर बाजार लिलाव न झाल्यास व ग्राम पंचायतीनी मागणी केल्यास त्यांना सदर बाजार शासकिय दराने देण्यात येईल. लिलावाच्या अटी व शर्ती तसेच लिलावासबंधीत विस्तृत माहीती कोणत्याही कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी ग्राम पंचायत विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया तसेच सर्व पंचायत समितीच्या मुख्यालयी व जि.प. गोंदियाच्या वेबसाईट https://ZP Gondia gov.in वर पहावयास मिळेल.

**लिलावाचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे. तरी इच्छुकांनी दिलेल्या कार्यक्रमास उपस्थित राहावे.**

**लिलाव दिनांक** 13 / 03 / 2025 **वेळ** :- **सकाळी** 11.00 **वाजेपासुन**
**लिलावाचे स्थळ** :- **गोंदिया जि. प. सभागृह**

| अ.क्र | लिलावाचा प्रकार | पंचायत समितीचे नाव | बाजाराचे नाव | सरकारी बोली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | बैठकी बाजार (कृषी उत्पत्र बाजार समितीचा मार्केट यार्ड सोडुन) जिल्हा परिषद मालकीच्या जागेवरील बैठकी बाजारात फी वसुलीचे अधिकार जिल्हा परिषदेने नेमुण दिलेल्या ठेकेदराला राहतील. | गोंदिया | अदासी | 30718/- |
| | | | दासगांव बु. | 164656/- |
| | | | कामठा | 129564/- |
| | | | मुरदाडा | 144022/- |
| | | | पांढराबोडी | 154248/- |
| | | | रावणवाडी | 406083/- |
| | | | काटी | 108167/- |
| | | तिरोडा | इंदोरा खु. | 25202/- |
| | | | मुंडीकोटा | 296380/- |
| | | | सुकडी/डा. | 86167/- |
| | | | वडेगांव | 319891/- |
| | | सालेकसा | कोटजांभोरा | 16998/- |
| | | | साकरीटोला | 274656/- |
| | | देवरी | चिचगड | 421300/- |
| | | | ककोडी | 374550/- |
| | | | सावली/डो. | 86173/- |
| | | गोरेगांव | चोपा | 103531/- |
| | | | कुऱ्हाडी | 139211/- |
| | | सडक/अ | पांढरी | 228706/- |
| | | अर्जुनी/मोर. | नवेगांवबांध | 502386/- |
| 2 | मवेशी बाजार | सडक/अ | पांढरी | 5960/- |
| 3 | यात्रा स्थळ लिलाव (चैत्र पोर्णिमा निमित्त ठेक्याचा कालावधी यात्रा भरण्याच्या एक दिवसा अगोदर पासुन 6 दिवसा पर्यंत राहील.) | तिरोडा | सुकडी/डा | 3051/- |
| | | गोरेगांव | पोंगेझरा (बोळुंदा) | 1613/- |
| | | अर्जुनी/मोर. | प्रतापगड | 94783/- |

# बैठकी बाजार, मवेशी बाजार व यात्रा बाजार लिलावाच्या अटी व शर्ती

१. जिल्हा परिषदेशी संबंधीत अशी कोणतीही रक्कम शिल्लक असल्यास, ती आगावू भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.

२. लिलावासाठी बोली बोलण्यापूर्वी रोख रुपये ५०००/- (अक्षरी पांच हजार रुपये ) आगाऊ रक्कम भरावी लागेल, **तसेच एकापेक्षा जास्त बाजारासाठी बोली बोलण्याकरीता प्रत्येकी बाजार रुपये ५०००/- (अक्षरी पांच हजार रुपये ) आगाऊ रक्कम भरावी लागेल,** याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही व लिलाव बोलीची रक्कम भरणा केल्यानंतरच वरील आगाऊ रक्कम परत करण्यात येईल.( आधारकार्ड सोबत आणावे.)

३. जे बोली धारकांना लिलावाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर लिलाव मंजुर होईल त्यांना बोलीची रक्कम तसेच बाजार बोलीची २% अनामत रक्कम एकमुस्त RTGS/NEFT/NET BANKING द्वारे मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प. गोंदिया यांचे नावे असलेले **डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बैंक लिमीटेड, गोंदिया जिल्हा निधी क्रमांक ०२** या **मध्ये २ दिवसाचे आत भरणा करणे बंधनकारक आहे.** अन्यथा बाजाराची रक्कम जि. प. ला जमा न झाल्यामुळे ठेका रद्द समजण्यात येईल, लिलावामध्ये भाग घेण्यासाठी भरलेली आगाऊ रक्कम जप्त करण्यात येईल व **त्यांचे नांव काळया यादीत टाकण्यात येईल.**

४. अनामत म्हणुन भरलेली रक्कम ठेक्याचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल.

५. बाजार वसुलीचे सद्याचे दर जे निर्धारीत आहेत त्याच दराने ठेकेदारास वसुली करावी लागेल. बाजार निरीक्षणाच्या वेळी ज्यादा दराने वसुली केल्याचे आढळुन आल्यास, ठेकेदारावर ज्यादा वसुली बाबत दंड आकारणी येईल व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल किंवा ठेका रद्द करण्यात येईल.

६. बाजार वसुलीसाठी जिल्हा परिषद कार्यालयातुन मिळणारी पावतीबुक वापरावी लागतील अन्य ठिकानाहुन पावतीबुक खरेदी करण्यास किंवा पावतीबुक पत्रके छापण्याची मनाई आहे, असे आढळुन आल्यास ठेका रद्द करण्यात येईल. ठेकेदारास प्रती पावतीबुक रुपये १०/- प्रमाणे जमा करुन ग्रामपंचायत विभाग जि.प.गोंदिया येथून पासबुक प्राप्त करावी लागतील. ठेकेदारास बाजाराच्या प्रवेश द्वारावर दर पत्रकाचे बोर्ड लावावे लागेल, जेणे करुन निर्धारीत दरावर बाजार वसुली करता येईल. तसेच बोर्डाची निगा राखण्याची जबाबदारी सुध्दा ठेकेदाराची राहिल.

७. वसुली संबंधी प्रश्न उध्दभवल्यास ती ठेकेदाराची वैयक्तिक बाब राहिल. व त्याची सोडवणूक त्याला स्वत:च करावी लागेल.

८. जाहीर झालेले ठेके लिलाव न करता कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेत देण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.गोंदिया यांना राहील. साधारणता लिलाव सर्वात जास्त बोली बोलणाऱ्याच्या नावाने होत असला तरी लिलाव त्याच पध्दतीने मंजुर करण्याचे बंधन मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. गोंदिया यांच्यावर राहणार नाही. तसेच कोणतीही बोली बोलणारा आपल्या बोलीवर ठेका घेण्यास तयार असला पाहिजे.

९. लिलावा संबंधी कोणताही वादग्रस्त प्रश्न निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.गोंदिया यांचा निर्णय अंतीम राहिल.

१०. ज्या ठेकेदाराच्या नावाने ठेका झालेला आहे त्याला आपला ठेका दुस-याला देता येणार नाही व एजेंट (दलाल) नियुक्ती करता येणार नाही असे आढळुन आल्यास ठेका रद्द करण्यात येईल व त्यावर कोणतीही उजर तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

११. ज्याच्या नावाने ठेका मंजुर करण्यात येईल त्याला ठेका मंजुर केल्यास दिनांकापासून ७ दिवसाच्या आत करारनामा लिहुन देणे बंधन कारक राहिल तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद गोंदिया यांनी करारनामा स्विकृत केल्याशिवाय ठेक्याचा कब्जा मिळणार नाही.

१२. ७ दिवसाच्या आंत करारनाम लिहुन न दिल्यास ठेकेदाराने जमा केलेली अमानत रक्कम जप्त करुन फेर लिलाव करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांना राहिल.

१३. ज्याच्या नावाने बैठकी बाजार, मवेशी बाजाराच्या ठेका कायम होईल त्याला सदर ठेक्याचा कब्जा घेण्यापूर्वी स्वत: व्यतिरक्त ती रक्कम वसुल करण्यासाठी नेमलेल्या व्यक्ति किंवा व्यक्तिचे पुर्ण नाव, पत्ता व वय इत्यादी बाबतची माहिती जिल्हा परिषदेला द्यावी लागेल. त्यातील व्यक्तिबबात आक्षेप असल्यास त्याला/ त्यांना ठेकेदाराने ताबडतोब कमी केले पाहीजे.

१४. लिलावाच्या अटी किंवा करारनाम्यामधील अटी व शर्तीपैकी कोणत्याही अटी व शर्तीचे उलंघण केल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांना उर्वरीत कालावधीचा ठेका रद्द करुन ठेक्याची अमानत रक्कम जप्त करणे किंवा रुपये १०,०००/- पर्यंत दंड करणे अथवा दोन्ही दंड करण्याचा अधिकार राहिल. .

१५. कोणत्याही अटीस आवश्यक व पुरेशे असमाधानकारक वाटल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांना सवलत देण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार राहतील.

१६. सर्व ठेके जिल्हा परिषदेचे सक्षम अधिकारी आणि समिती यांनी कायम केल्यानंतरच अधिकृत रित्या ठेके पक्के होतील. सक्षम अधिकारी व समित्या यांनी ठेके नाकारल्यास फेर लिलाव होईल.

१७. आठवडी बाजार भरत असलेल्या जागेवर दुसऱ्या दिवशी बाजाराची साफ सफाई करणे ठेकेदाराची जबाबदारी राहील. तसेच पिण्याचे पाण्याची व्यवस्था करणे ठेकेदाराची जबाबदारी राहील.

१८. बाजाराची जागा व व्यवस्था सध्या अस्तित्वात आहे त्याला अनुसरुनच लिलावाची बोली राहील.

१९. ज्या यात्रा बाजाराचे लिलाव दिनांक १३/०३/२०२५ ला स्थगीत होईल. त्याचे लिलाव पुन्हा दिनांक १९/०३/२०२५ ला सकाळी ११.०० वाजेपासुन जिल्हा परिषद सभागृहात करण्यात येतील. याबाबत पुन्हा स्वतंत्र जाहिरात प्रकाशीत करण्यात येणार नाही याची सर्वानी विशेष नोंद घ्यावी.

**मुळ टिपणी मा. मु.का.अ. जि.प. गोंदिया यांचे कडून अनुमोदित**

| | |
|---|---|
| **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**<br>**( पंचायत )**<br>**जिल्हा परिषद, गोंदिया**<br>Signed on E-Office | Signed by<br>Madhukar Manoharrao Wasnik<br>Date: 08-03-2025 12:52:43 |

**प्रतिलिपी :-**

१. मा.अध्यक्ष /उपाध्यक्ष, जिल्हा परिषद,गोंदिया यांना माहिती करीता सादर.

२. सभापती -------------------------------- जिल्हा परिषद गोंदिया यांना माहितीकरीता व आपल्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर लावून जाहिरनामा प्रसिध्द करण्याकरीता अग्रेषित.

३. खाते प्रमुख -------------------------- (सर्व) जिल्हा परिषद, गोंदिया यांना माहिती करीता व आपल्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर लावून जाहिरनाम प्रसिध्द करण्याकरीता अग्रेषित. गट विकास अधिकारी, पंचायत समिती,------------------- (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित. यासोबत लिलाव कार्यक्रम पाठविण्यात येत असुन प्रत कार्यालयीन नोटीस बोर्डावर लावून प्रसिध्द करण्याकरीता व गावात बाजार लिलावाची दवंडी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.